पुढारी MY कोल्हापूर सोमवार, २९ एप्रिल २०२४

# इलेक्ट्रॉनिक कॉमर्स जागरूकता अभियानास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजमधील वाणिज्य विभागामार्फत इलेक्ट्रॉनिक कॉमर्स जागरूकता अभियान राबविण्यात आले. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

सध्याच्या इलेक्ट्रॉनिक कॉमर्सअंतर्गत येणाऱ्या विभिन्न गोष्टींमुळे सर्वसामान्य नागरिकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी करणे गरजेचे आहे, यासंदर्भात बी.कॉम. भाग-२ व बी.कॉम. भाग-३ च्या विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. यामध्ये एटीएम/ डेबिट / क्रेडिट कार्ड वापरताना कोणती दक्षता घ्यावी, मोबाईल बँकिंग व इंटरनेट बँकिंग वापरताना कोणती दक्षता घ्यावी, सोशल मीडियाचा वापर व सायबर गुन्हेगारीबद्दल घ्यावयाची काळजी याची माहिती देण्यात आली.

अभियानांतर्गत कोल्हापूर शहर व जिल्ह्यातील ५६ गावांतील, १३०० पेक्षा जास्त कुटुंबांमध्ये जनजागृती करण्यात आली. अभियानाचे समन्वयक म्हणून डॉ. उमेश दबडे यांनी काम पहिले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व डॉ. श्रुती जोशी यांचे विद्यार्थ्यांना जनजागृतीसाठी मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद
सोमवार २९ एप्रिल २०२४

P
29/04/2024

# विवेकानंदमध्ये इलेक्ट्रॉनिक कॉमर्स जागरूकता अभियान

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज (अधिकारप्रदत्त स्वायत्त ) मधील वाणिज्य विभागामार्फत या कालावधीत इलेक्ट्रॉनिक कॉमर्स जागरूकता अभियान राबविण्यात आले. सध्याच्या इलेक्ट्रॉनिक कॉमर्स अंतर्गत येणाऱ्या विभिन्न गोष्टीमुळे सर्व सामान्य नागरिकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी करणे गरजेचे आहे. यासंदर्भात परिपत्रकामार्फत बी. कॉम भाग-२ व बी. कॉम भाग-३ च्या विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. यामध्ये वापरताना कोणती दक्षता घ्यावी, मोबाईल बँकिंग व इंटरनेट बँकिंग वापरताना कोणती दक्षता घ्यावी, सोशल मिडियाचा वापर व सायबर गुन्हेगारीबद्दल घ्यावयाची काळजी तसेच नागरिकांनी ऑनलाईन आर्थिक फसवणूक झाल्यास आपली तक्रार कोठे नोंदवावी याविषयी माहिती दिली. अभियान कोल्हापूर शहर व कोल्हापूर जिल्ह्यातील ५६ गावातील १३०० पेक्षा जास्त कुटुंबामध्ये जनजागृती केली. या अभियानाचे समन्वयक म्हणून डॉ. उमेश दबडे यांनी काम पहिले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी यांचे अभियानासाठी मार्गदर्शन लाभले. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. सनी काळे, डॉ. अमोल मोहिते, डॉ. योगेश माने यांनी अभियानाचे नियोजन केले.

29.4.24